शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न शासकीय, अशासकीय अनुदानित/
विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील प्रलंबित कार्यवाही त्वरीत पूर्ण करणेबाबत डॉ. धनराज माने शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांचे क्र. उशिसं/शिष्य-१९-२०/डीबीटी/३७५८/३७७० दि. १४ मार्च, २०२० रोजीच्या पत्रानुसार सन २०१९-२० करिता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १६ मार्च, २०२० अशी अंतिम मुदत आहे. याबाबतचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 530
दि. 16 MAR 2020

d:\2019\mangutkar\circular.docx

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in Mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०१९-२०/डीबीटी / 3758 दि.११/०३/२०२०

14 MAR 2020

तात्काळ/अत्यंत महत्वाचे

प्रति,

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
२. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

**विषय :- विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील प्रलंबित कार्यवाही त्वरीत पूर्ण करणेबाबत.**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२, दि. ०२/०८/२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७
३. शासन निर्णय क्र. मातंस-२०१८/प्र.क्र. १३८/से-१/३९, दि. १२.१०.२०१८
४. संचालनालयाचे दि. ३०.०७.२०१९, दि. ३१.०७.२०१९, दि. ९.०८.२०१९, दि. २०.०८.२०१९, दि. ७.१०.२०१९, दि. १५.१०.२०१९, दि. १.११.२०१९, दि. ४.११.२०१९, दि. ६.११.२०१९, दि. १३.११.२०१९, दि. १६.११.२०१९, दि. २६.११.२०१९, दि. १२.१२.२०१९, दि. १८.१२.२०१९, दि.२३.१२.२०१९ दि. २३.१२.२०१९, दि.१५.०१.२०२०, दि.२७.०१.२०२०, दि.०१.०२.२०२०, दि. ०६.२.२०२०, दि. ७.२.२०२०, दि.१५.२.२०२०, दि १८.२.२०२०, दि. २४.०२.२०२०, दि. २६.०२.२०२०, दि. २.०३.२०२० व दि. ६.३.२०२० रोजीचे पत्र.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या विविध १४ शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. विद्यार्थी / महाविद्यालयांच्या मदतीसाठी डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच संदर्भिय संचालनालयाच्या पत्रान्वये वेळोवेळी लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि अद्यापही अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था यांच्या स्तरावर पडताळणीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे.

**तरी याबाबत पुनःश्च कळविण्यात येते सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १६ मार्च, २०२० अशी अंतिम मुदत आहे.** महाविद्यालय स्तरावरुन अर्जांची पडताळणी करणेसाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली असून, यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. मुदतीनंतर प्रलंबित राहीलेले अर्ज महाडीबीटी प्रणालीतून आपोआप रजेक्ट होतात. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालय /संस्था/ विद्यापीठाच्या स्तरावर प्रलंबित राहणार नाहीत. याची दक्षता घ्यावी. दिलेल्या मुदतीनंतर अर्ज प्रलंबित राहील्यामुळे पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास याबाबत सर्वस्वी संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य / विद्यापीठांचे कुलसचिव जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य.१९-२०/डीबीटी/ 3770 दि. ११.०३.२०२०

तात्काळ ईमेलद्वारा

14 MAR 2020

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील प्रलंबित कार्यवाही त्वरीत पूर्ण करणेबाबत.**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२, दि. ०२/०८/२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७
३. शासन निर्णय क्र. मातंस-२०१८/प्र.क्र. १३८/से-१/३९, दि. १२.१०.२०१८
४. संचालनालयाचे दि. ३०.०७.२०१९, दि. ३१.०७.२०१९, दि. ९.०८.२०१९, दि. २०.०८.२०१९, दि. ७.१०.२०१९, दि. १५.१०.२०१९, दि. १.११.२०१९, दि. ४.११.२०१९, दि. ६.११.२०१९, दि. १३.११.२०१९, दि. १६.११.२०१९, दि. २६.११.२०१९, दि. १२.१२.२०१९, दि. १८.१२.२०१९, दि.२३.१२.२०१९ दि. २३.१२.२०१९, दि.१५.०१.२०२०, दि.२७.०१.२०२०, दि.०१.०२.२०२०, दि. ०६.२.२०२०, दि. ७.२.२०२०, दि.१५.२.२०२०, दि १८.२.२०२०, दि. २४.०२.२०२०, दि. २६.०२.२०२०, दि. २.०३.२०२० व दि. ६.३.२०२० रोजीचे पत्र.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. विद्यार्थी / महाविद्यालयांच्या मदतीसाठी डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच संदर्भिय संचालनालयाच्या पत्रान्वये वेळोवेळी लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि अद्यापही अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था यांच्या स्तरावर पडताळणीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे.

तरी याबाबत पुनःश्च कळविण्यात येते सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी **दि. १६ मार्च, २०२०** अशी अंतिम मुदत असून, मुदतीनंतर प्रलंबित राहीलेले अर्ज महाडीबीटी प्रणालीतून आपोआप रजेक्ट होतात. त्यामुळे आपल्या विभागामधील ज्या महाविद्यालयांच्या स्तरावर शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित आहेत, अशा महाविद्यालयांचा आढावा घेऊन महाविद्यालयाच्या स्तरावर प्रलंबित अर्ज मुदतीमध्ये निकाली काढणेबाबत सूचना देण्यात याव्यात. दिलेल्या मुदतीनंतर अर्ज प्रलंबित राहील्यामुळे पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास याबाबत सर्वस्वी संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य / विद्यापीठांचे कुलसचिव जबाबदार राहतील. अशा सूचना अधिनस्त महाविद्यालय / विद्यापीठांना देण्यात याव्यात.

तसेच महाडीबीटी पोर्टलवरुन महाविद्यालयांनी मंजूर केलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची विभाग स्तरावरुन पडताळणी करण्याची अंतिम मुदत दि. २२.०३.२०२० अशी आहे. तथापि अंतिम मुदतीची वाट न पाहता पडताळणीसाठी प्राप्त झालेले अर्ज दररोज (Daily Basis) निकाली काढावेत. कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :-१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.